# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक १५ जुलै, २०२५
## (सकाळी ०९.३० ते १०.४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक ८ जुलै, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु राखून ठेवण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १)**

**(१) श्री. राजेश बकाने, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या बोगस व उगवण क्षमते अभावी अयशस्वी ठरत असलेल्या सोयाबीन बियाण्यांच्या विक्रीबाबात वर्धा जिल्ह्यातील शेतकरी त्रस्त असल्याचे माहे जून, २०२५ मध्ये निदर्शनास आले असणे, यामध्ये मे. वरूण सिडस अँड ॲग्रोटेक (इंडीया) प्रा. लि. हैद्राबाद या कंपनीचे श्री गणेशा सोयाबीन असणे, बोगस व उगवण क्षमतेबाबत अनेक तक्रारी शेतक-यांनी केल्या असणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी चौकशी करून दोषी अधिकारी व कंपनीवर कारवाई करण्याची मागणी करणे, यावर शासनाने तात्काळ दखल घेऊन करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रीया."

**(शुक्रवार, दिनांक ४ जुलै, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २)**

**(२) श्री. कृष्णा खोपडे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पणन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"एक सदस्यीय पी.एल.खंडागळे समितीचा १४ पानी चौकशी अहवाल पणन संचालक यांना दिनांक २५ ऑगस्ट, २०२३ रोजी व त्यापूर्वी दिनांक ०६ जुलै, २०१७ रोजी के.डी.पाटील जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांचा चौकशी अहवाल शासनास सादर होणे, दोन्ही चौकशी अहवालात नागपूर कृ.उ.बा.स.संचालक मंडळाचा भ्रष्टाचार उघडकीस आला असून संचालकांनी परिवाराच्या नावाने गाळे घेणे व सभापती यांनी परिवारातील सदस्यांना गाळे आवंटीत करणे, सभापती यांनी अधिकार नसताना दोन गाळयांचे सबलिज रजिस्टर करून घेणे, अधिनियम १९६३ नियम १९६७ मधील नियम ६(४) अपात्र असताना गाळा प्राप्त करून घेणे व लिलाव न करता स्वमर्जीने संचालक व अन्य लोकांना थेट गाळे देणे, या प्रकरणात तत्कालीन सचिवांचा समावेश असणे, सादर झालेला चौकशी अहवाल शासनस्तरावर दाबून ठेवणे यात एका नेत्याचा समावेश असण्याची शक्यता असणे, खंडागळे समितीचा चौकशी अहवालात APMC मधील बकरामंडी सेसच्या माध्यमातून ५१ दलाल व अधिकाऱ्यांनी शासनाचा अंदाजे ४० कोटीचा महसूल बुडविणे, २० वर्षात

९५,०००/- सेस दाखवणे, ३ वर्षात सेस 'निल' दाखवणे, सादर अहवालाचे अनुषंगाने ५१ बकरामंडी दलाल यांचे दिनांक ७ मे, २०२५ रोजी परवाने रद्द करून दंडासहित वसुली करण्याचे पणन संचालक यांनी दिलेले आदेश, सचिवांद्वारे जाणीवपूर्वक कारवाईत विलंब करून दलालांना न्यायालयात जाण्याची संधी देण्यात येणे, दोन्ही चौकशी अहवालात जाणीवपूर्वक शासनाचे महसूल बुडविल्याचे गंभीर स्वरूपाचे आरोप असणे, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

**(३) श्री. संदिप क्षीरसागर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"बीड नगरपरिषदेच्या (जि. बीड) हद्दीतील सर्व्हे नं.२९ तरफ माळी, सर्व्हे नं.१९४ तरफ बलगुजर, सर्व्हे नं.१९७, १९८, १९९ तरफ खोड, सर्व्हे नं.५३ (आरक्षण क्र.१३१), ५६, ५९ (आरक्षण क्र.१३३), १७३ तरफ बलगुजर, सर्व्हे नं.३४, ३५, ६८, ६९, ७९ तरफ गिराम, सर्व्हे नं.१८८ (आरक्षण क्र.३७) तरफ पिंगळे, सर्व्हे नं.१६ (आरक्षण क्र.१०७), १७ (आरक्षण क्र.१०८) तरफ देशमुख, सर्व्हे नं.३१,३२ तरफ खोड, सर्व्हे नं.१५१,१५२ तरफ बोबडे, या भूखंडावर आरक्षण असताना सुद्धा नगरपरिषद प्रशासनाने चुकीच्या पद्धतीने ले-आऊट करत शासनाचा मोठ्या प्रमाणावर महसूल बुडवणे, प्रचंड प्रमाणात केलेला भ्रष्टाचार, असाच भ्रष्टाचार त्यांनी नगरपरिषद बीड येथे इतर ठिकाणी सुद्धा केलेला असणे, अशा भ्रष्टाचाराच्या व अनियमिततेच्या तक्रारी तेथील लोकांनी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे केलेल्या असणे, झालेली अनियमितता व भ्रष्टाचार उघड होऊ नये यासाठी त्यांनी या संचिका गहाळ करणे, नगरपरिषद प्रशासनाविरुद्ध तेथील नागरिकांनी यापूर्वी सुद्धा तक्रारी दाखल करणे, याबाबत यांच्या विरुद्ध तेथील लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी बीड यांचेकडे दिनांक ११ फेब्रुवारी, २०२५ रोजी पत्राद्वारे तक्रार करुन सुद्धा अद्यापही बीड नगरपरिषद प्रशासनाविरुद्ध कारवाई करण्यात न आल्यामुळे तेथील नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष, बीड नगरपरिषद प्रशासनाविरुद्ध त्वरीत कारवाई करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) श्री. मंगेश कुडाळकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"कुर्ला पश्चिम लालबहादुर शास्त्री मार्गावर मोठ्या प्रमाणात हॉटेल्स असणे, शनिवार दिनांक ११ जानेवारी २०२५ रोजी रात्री ९:०० वाजता कुर्ला पश्चिम लालबहादुर शास्त्री मार्गावर स्थित असलेले रंगून जायका या हॉटेलला आग लागणे, मात्र सुदैवाने कोणतीही जीवित हानी नसणे, याआधी देखील कुर्ला येथील सिटी किनारा हॉटेलला दिनांक १६ ऑक्टोबर २०१५ रोजी लागलेल्या आगीत आठ जणांचा मृत्यू झाला असणे, मुंबई उच्च न्यायालयाने बृहन्मुंबई महानगरपालिकेला निष्काळजीपणासाठी जबाबदार धरणे, लोकप्रतिनिधी म्हणून एल विभागातील इमारत व कारखाने या विभागाच्या सहाय्यक अभियंता आता असलेल्या सर्वच हॉटेल्सला दिलेल्या परवानग्या अथवा त्यांनी केलेले बांधकाम वैध आहे की नाही याची तपासणी करण्याबाबत वारंवार सांगणे, तसेच एल विभागाकडून आरोग्य व अग्निशमन विभागाकडून कोणत्या प्रकारच्या परवानग्या यांना

दिल्या आहेत याची तपासणी करण्यास सांगणे, परंतु एल विभागाच्या अधिकाऱ्यांकडून कारवाई करण्यास होत असलेल्या दिरंगाईतून लोकांमध्ये असंतोष पसरणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(५) श्री. सचिन कल्याणशेट्टी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"सोलापूर जिल्हयातील व अक्कलकोट तालुक्यामधील मैंदर्गी नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये ठिकठिकाणी शासकीय जमिनींवर तसेच शहरातील रस्त्यांवर अनधिकृतरित्या व्यवसायिक गाळे बांधून तसेच धार्मिक स्वरुपाचे बोर्ड लाऊन अतिक्रमण केलेले असणे. मैंदर्गी शहरातील मुख्य गाणगापूर-अक्कलकोट बायपास रोड, स्टँड रोड (जुना कत्तलखाना रोड) तसेच मैंदर्गी अक्कलकोट रोड या रस्त्यांच्या कडेला व काही ठिकाणी रस्त्यांवर बेकायदेशीररीत्या मटण मार्केटचे गाळे, गॅरेज तसेच अनधिकृत बोर्ड उभारलेले असणे व त्यामुळे नागरीकांना ये-जा / प्रवास करण्यासाठी त्रास सहन करावा लागणे, सदर बेकायदेशीर मटण मार्केटमुळे परिसरात दुर्गंधी पसरुन नागरीकांना त्याचा त्रास होणे, तसेच सदर मटण मार्केटमधील कच-यामुळे आरोग्याचे प्रश्न निर्माण होणे, शहरातील अतिक्रमणांमुळे वारंवार छोटे-मोठे अपघात होऊन नागरीक जखमी होणे व त्यांच्या जिवीतास धोका पोहचणे, मैंदर्गी नगरपरीषदेच्या हद्दीमध्ये विविध प्रकारचे अनधिकृत धार्मिक बोर्ड लागलेले असल्यामुळे शहराच्या सौंदर्यास बाधा पोहचून विद्रुपीकरण होणे व याबाबत नगरपरिषद प्रशासनाकडून महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरीता अधिनियम १९९५ अन्वये नियमानुसार व प्रभावीपणे कार्यवाही न करणे, तसेच शहरातील शासकीय जमिनीवर तसेच रस्त्यांवरील झालेली अतिक्रमणे विशेषत: धार्मिक स्वरुपाची, यास प्रतिबंध न करणे व झालेली अतिक्रमणे निष्कासित न करणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही."

**(६) सर्वश्री. दिलीप लांडे, सुनिल प्रभू, योगेश सागर, तुकाराम काते, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई शहरासह उपनगरांमध्ये मोठ्या प्रमाणात डोंगराळ भाग असणे, सदर डोंगर उतारावर मोठ्या प्रमाणात झोपडपट्टी वसलेली असणे, सन २००० पासून सुमारे ३६२ ठिकाणी दरड कोसळली असणे, त्यामध्ये १६६ रहिवाश्यांचा मृत्यू झालेला असणे, तर सुमारे १६६ रहिवाशी जखमी झाले असणे, चांदिवली मतदार संघामध्ये दिनांक ३ सप्टेंबर २००९ रोजी दरड कोसळून ३ मुलांसह १० जण मृत्युमुखी पडले असणे, तर १३ जण गंभीर जखमी झाले असणे, त्यानंतर केंद्र व महाराष्ट्र शासनाने सदर लोकांचे पुनर्वसन करणे, महाराष्ट्र शासन ग्रामीण भागामध्ये अशा धोकादायक परिस्थितीत राहणाऱ्या लोकांचे पुनर्वसन करीत असणे, सन २००७ च्या धर्तीवर मुंबई उपनगरांमधील डोंगर उतारावर राहणाऱ्या कुटुंबाचे/सर्वेक्षण करून त्यांना कायमस्वरूपी सुरक्षित जागेवर स्थलांतरित करुन संभावीत जीवित हानी टाळण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(७) सर्वश्री भीमराव तापकीर, विजय शिवतारे, सुनिल कांबळे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"पुणे मनपामध्ये समाविष्ट ३२ गावांतील मिळकतींना ग्रामपंचायतींच्या तुलनेत जास्त दराने मिळकत कर आकारला जात असणे, तत्कालीन मुख्यमंत्री यांनी थकबाकी वसुली स्थगिती देणे परंतु मनपाकडून सक्तीने वसुली सुरू असणे, याचा पुनर्विलोकन प्रस्ताव शासनाकडे निर्णयासाठी प्रलंबित असणे, समाविष्ट गावांतील कर्मचाऱ्यांबाबत विभागीय चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालावर अद्याप निर्णय झालेला नसणे, परिणामी कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ ओढवली असणे, ख. म. संघात नाल्यालगत आणि सोसायटीच्या सीमाभिंती बांधण्यासाठी नगरविकास विभागाने ७५ कोटी रुपयांचा विशेष निधी मंजूर केला असणे, मात्र निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ही कामे रद्द करण्यात आली असणे, संभाव्य पूरस्थिती पाहता निधी पुनः वितरीत करणे, २०२१ मध्ये समाविष्ट ११ गावांतील जलशुद्धीकरण प्रकल्प, पाण्याच्या टाक्यांसाठी रुपये ६०६ कोटींची मागणी शासनाकडे प्रलंबित असणे, डी.पी. रस्तारुंदी कायदा अद्याप प्रलंबित असणे, परिणामी अतिक्रमण होत असणे, UDCPR २०२० कलम ११.३ नुसार 'क्रेडिट बॉण्ड पॉलिसीत' अतिमहत्त्वाचे रस्ते ताब्यात घेणे, ख. म. संघात मनपाच्या ताब्यातील सर्व ॲमिनिटी स्पेस व त्यावरील सार्वजनिक वास्तूंची नव्याने बाजारभावाच्या भाडेपट्ट्याने निविदा प्रक्रिया राबविणे, वारजे - जुना जकात नाका ते हायवे आणि हायवे ते गणपती माथा ३० मीटर D.P. रस्त्याच्या भूसंपादनासाठी निधी शासनाने उपलब्ध करणे, समाविष्ट गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचे नियोजन नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) श्री. महेश लांडगे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (वित्त) यांचे लक्ष वेधतील :-**

"पिंपरी चिंचवड येथील जाधववाडी येथे राहणाऱ्या दीपक भगत याचे मोहम्मद कैश रेहमानी याने लोन देण्याच्या बहाण्याने कागदपत्रे घेणे, सदर कागदपत्रांच्या आधारे मोहम्मद कैश रहमान याने बनावट (शेल) कंपनी स्थापन करणे, सदर कंपनीच्या माध्यमातून कशफ ट्रेडिंग कंपनीस बनावट बिले दिली जात असणे, या माध्यमातून इनपुट टैक्स क्रेडिट (ITC) घेवून करोडोंचा वस्तु व सेवा कर (GST) बुडविणे, याबाबत वस्तू आणि सेवा कर गुप्तवार्ता संचालनालयाकडून केलेल्या चौकशीमध्ये सदर कंपनीचा प्रोपरायटर मोहम्मद अहमद असला तरी सदर कंपनी मोहम्मद कैश रहमानी चालवत असणे, दिपक भगत यांची फसवणूक करून त्याच्या नावे कंपनी स्थापन केल्या प्रकरणात MIDC पोलीस स्टेशन भोसरी येथे गुन्हा दाखल झालेला असणे, सदर गुन्ह्यात मूळ फिर्यादीने प्रलोभन अथवा दबावात प्रतिज्ञापत्र दाखल केल्याने आरोपींना जामीन मिळालेला असणे, तसेच मोहम्मद कैश रेहमानी याने आशिया स्टील ट्रेडर्स दुकानाव्दारे GST बुडविलेला असणे, सदर प्रकरणांत दोषींवर आजपर्यंत ठोसपणे कारवाई झालेली नसणे, अशाप्रकारे बनावट (शेल) कंपन्या स्थापन करून त्याद्वारे कर बुडवणारे रैकेट पिंपरी चिंचवडचे कुदळवाडी व चिखली परिसरात कार्यरत असणे, या माध्यमातून निर्माण होणारी अवैध संपत्ती देशविरोधी

कारवायांसाठी वापरली जाण्याची संभावना असणे, याबाबत शासनाची भुमिका व उपाययोजना."

**(९) डॉ. राहूल आहेर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"नाशिक जिल्ह्यातील चांदवड देवळा मतदार संघातील चांदवड तालुक्यात ऑक्टोबर - २०२४ मध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे ओरीएंटल पिकविमा कंपनीने दोन महिने उशिराने केल्यामुळे चांदवड तालुक्यातील ६४,१२५ पिक विमाधारक शेतकऱ्यांपैकी केवळ २० हजार २८८ शेतकऱ्यांचे पंचनामे झाले असून तब्बल ४३ हजार ८३७ शेतकरी वंचित राहणार असणे, तर देवळा तालुक्यातील ३८,४९१ शेतक-यांपैकी केवळ ११,५९७ शेतक-यांचे पंचनामे झाले असून २६,८९४ शेतकरी पिक विमा अनुदानापासून वंचित राहणार असणे, यात झालेल्या नुकसानाची टक्केवारी देखील कमी दाखविण्यात आली असणे, ओरीएंटल पिकविमा कंपनीने केलेल्या निष्काळजीपणामुळे महसूल, कृषी व ग्रामविकास विभागाच्या पंचनाम्यानुसारच मदत द्यावी अशी मागणी शेतकरी करीत असणे, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करून पंचनाम्यानुसारच शेतकऱ्यांना मदत देण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१०) श्री. हारुन खान, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"न.भू.क्र. १/१०७, १/१०८, १/१११, १/११२, १/११३, १/११४, १/११५, १/११६ या अंधेरी (प.) येथील भूखंडावर वेगवेगळ्या सोसायट्यांचा एकत्रित पुनर्विकास करण्याकरिता कमिटी सदस्य व उपनिबंधक, सहकारी संस्था, के/पश्चिम विभाग, मुंबई यांनी कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार करणे, ७९/अ प्रक्रियेत शासन निर्णय क्र. संकीर्ण ०२२१/प्र.क्र.२४/१३-स दि. १२.५.२०२२ प्रमाणे सभासदांचा प्रत्यक्ष सहभाग आवश्यक असतांना देखील व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे २/३ पेक्षा जास्त सभासदांची उपस्थिती दाखवून विकासक मेसर्स किस्टोन रिएलटर्स लि. यांच्या बाजूने निर्णय दिला असल्याचे माहे मे, २०२५ च्या दरम्यान निदर्शनास येणे, कायद्यामध्ये तरतूद असूनही प्रत्येक कमिटीने पत्रक काढत सर्वसाधारण सभाही सर्वस्वी असून सभेमध्ये घेतलेला निर्णय अंतिम आहे व त्याप्रमाणे निविदा प्रक्रिया रद्द करीत आहोत असे सभासदांना नियमबाह्यपणे कळविणे, अरेना को.ऑ.हौ.सोसायटी मॅनेजिंग कमिटी व इतर सात सोसायटी, लोखंडवाला, अंधेरी (प.), मुंबई सोबत या सर्व सोसायटीचे कमिटीचे पुनर्विकासासाठी केलेल्या कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहाराची सखोल चौकशी करण्याकरिता मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी तत्कालिन उपमुख्यमंत्री तथा गृह व ऊर्जामंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दि. २५.९.२०२४ रोजी पत्रव्यवहार करणे, जागेची मालकी सोसायटीच्या नावे नसतांना नियमबाह्य सामूहिक विकास (क्लस्टर) करण्याकरिता विकासक मेसर्स किस्टोन रिएलटर्स लि. यांना संमती देणाऱ्या आठ कमिटींची शासनाने चौकशी करण्याची आवश्यकता, सदर प्रकरणी संबंधित सदस्य, विकासक व उपनिबंधक/सहनिबंधक यांच्या विरुद्ध शासनाने केलेली व करावयाची कारवाई, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

## ( सकाळी ११.०० वाजता )

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **उप मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री** : महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा निधी विश्वस्त कंपनी मर्यादित (MUIFTCL) यांचा आणि महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कंपनी मर्यादित (MUIDCL) यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** :

**(क)** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे सन २०२३-२०२४ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांचे सन २०२३-२०२४ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे सन २०२३-२०२४ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ)** महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, नागपूर यांचे सन २०२३-२०२४ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(च)** महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(३) **वस्त्रोद्योग मंत्री** : महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित व महामंडळाची दुय्यम कंपनी प्रताप मिल, अमळनेर यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा अठ्ठावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(शुक्रवार, दिनांक ११ जुलै, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १)**

**(१) श्री. राजु तोडसाम, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा येथील अनेक गावांमध्ये मनरेगा अंतर्गत मजूरांच्या नावे असलेल्या बँक खात्यांमध्ये अचानक १०० कोटींपेक्षा अधिक रक्कम जमा झाली असणे, परंतु या खात्यांतील मजूर हे प्रत्यक्षात बेरोजगार, आर्थिकदृष्ट्या कमकुवत असून त्यांना ही रक्कम का व कशासाठी आली याबाबत कोणतीही माहिती नसणे, आणि परस्पर खातेदार व्यक्तींच्या खात्यांमधून ऑनलाईन पद्धतीने काढण्यात पण आली असणे, या रकमेचा वापर काही संशयास्पद व्यक्तींनी काळा पैसा पांढरा करण्यासाठी केल्याचा संशय असणे, स्थानिक पोलीस आणि बँक अधिकारी यांच्या माध्यमातून याप्रकरणी चौकशी सुरू झाली असून, अनेक मजुरांनी फसवणूक झाल्याच्या तक्रारी दिल्या असणे, या घोटाळ्यात बँकेतील कर्मचाऱ्यांची भूमिका, शासनाच्या योजनांमधील यंत्रणांची लाचारी आणि आर्थिक फसवणुकीचा मोठा कट असल्याचे दिसून येणे, त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी सीबीआय / ईडीमार्फत करण्याची होत असलेली मागणी, तसेच दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(२) श्री. संजय केळकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्राच्या ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा शहरामध्ये आज रोजी मोठ्या प्रमाणात अनधिकृत मस्जिद व मदरसा यांचे बांधकाम झालेले असणे, या अनधिकृत मस्जिद व मदरसा यांच्याबाबत दिनांक १४ जून, २०२३ रोजी मुंब्रा पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती दिलेली असणे, सदर माहितीनुसार मुंब्रा पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये ११२ मस्जिद व ४३ मदरसे असणे, यातील सर्व मदरसे अनधिकृत असणे, मुंब्रा शहर व लगतच्या परिसरामध्ये शासकीय व वन जमिनींवर तसेच सार्वजनिक जागेवर अतिक्रमण करुन, बेकायदेशीररित्या काही मस्जिद व मदरसा यांचे बांधकाम केलेले असणे, याबाबत स्थानिक नागरीक, सामाजिक कार्यकर्ते तसेच राजकीय संघटना यांच्याकडून वारंवार शासनास व प्रशासनास तक्रारी व निवेदने प्राप्त होत असणे, काही अनधिकृत मस्जिद व मदरसे यांमध्ये अवैध तसेच राष्ट्रीय सुरक्षेला धोका पोहचेल अशी कृत्ये सुरु असल्याच्या तक्रारी प्राप्त होत असणे, तसेच सदर अनधिकृत मस्जिद व मदरसे यांमुळे हिंदू व मुस्लीम यांच्यातील सामाजिक सलोख्यास बाधा पोहचत असणे व त्यामुळे कायदा व सुव्यवस्था याचा प्रश्न निर्माण

होण्याची शक्यता असणे, त्याअनुषंगाने मुंब्रा शहरातील अनधिकृत मस्जिद व मदरसे यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत शासनाची भुमिका व पुढील उपाययोजना."

**(३) सर्वश्री. वरुण सरदेसाई, सुनील राऊत, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई वांद्रे पूर्व विधानसभा मतदार संघामध्ये ४२ एकर जमीन डिफेन्स लँड म्हणून संरक्षण विभागाचे मालकी हक्क असल्याने याठिकाणी असलेल्या पारंपरिक एकूण ९४८३ झोपड्यांच्या राहिवाशांचा पुर्नविकास रखडलेला असणे, शासनाने येथील रहिवाशांच्या पुर्नविकासाकरिता दिनांक १७ मे २०१८ रोजी बैठक घेऊन मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली केंद्र सरकारच्या सुचनेनुसार समिती गठित करणे, या रहिवाशांच्या पुर्नविकासाकरिता समितीने अहवाल केंद्र शासनास अद्याप सादर केलेला नसणे, डिफेन्स लँड वरील रहिवाशांचा पुर्नविकास कधी पर्यंत करण्यात येईल याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

**(४) श्री. संग्राम जगताप, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"शेख साजिद व शेख खलील हे सन २००१ पासुन मुद्रांक विक्रेते असणे, सन २००१-२००४ दरम्यान तहसील कार्यालय साक्री येथे बनावट जात प्रमाणपत्र प्रकरणात संबंधितांना शास्ती झालेली असणे, त्यानंतर संबंधित व्यक्तींनी पुनश्च: मालेगाव येथे मुद्रांक विक्री व्यवसाय सुरु केलेला असणे, गैरव्यवहार केल्यामुळे काही कालावधीकरिता संबंधिताचा मुद्रांक विक्री परवाना रद्द झालेला असणे, जमिनीच्या व्यवहारात विविध प्रकारचे बनावट नकाशे व बनावट दस्त तयार करुन तसेच बोगस बिनशेती आदेश घेऊन अंदाजे १०० ते १२५ कोटी रुपयांची मालमत्ता स्वत: व कुटुंबाच्या नावावर जमा केलेली असणे, सन २०२२-२३ मध्ये मालेगाव येथे पेट्रोलपंप ८.९० कोटींना खरेदी केलेला असणे, त्यावर लक्षवेधी क्रमांक ४०६ अन्वये तक्रार झाल्यानंतर चौकशी समितीमार्फत शासनाचे ९० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे निष्पन्न झाले असणे व त्याबाबतची वसुलीची शिफारस केलेली असणे, परंतु आजतागायत वसुली झालेली नसणे, मालेगाव शहरातील एक संशयित दहशतवादी फरार झाल्यावर त्याच्या मालमत्तेचे दस्त शेख साजिद, शेख वाजिद व ॲड. मन्नान यांच्या संगनमताने बनावट ओळखपत्राच्या आधारे नोंदवण्यात आले असणे, सदर बनावट खरेदीखताबाबत तक्रार दाखल झालेली असणे, त्यामुळे या गंभीर प्रकरणाची आर्थिक गुन्हे शाखा तसेच अंमलबजावणी संचालनालय (E.D.) यांच्यामार्फत चौकशी होऊन सदर घटनेतील संपत्ती जप्त करणेबाबत शासनाची भुमिका व उपाययोजना."

**(५) श्री. उत्तमराव जानकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"माळशिरस (जि. सोलापूर) तालुक्यातील नीरा उजवा कालव्याचे पाणी नियमानुसार २१ दिवसांच्या आत मिळणे आवश्यक असणे, परंतु फाटा क्रमांक ४४ ते ९४ या फाट्याला दोन पाळींमधले अंतर हे ७० दिवसांपेक्षा अधिकचे झाले असल्यामुळे उन्हाळ्यात शेतकऱ्यांची पीके जळून जात असणे, सध्याच्या स्थितीत नीरा देवघर प्रकल्पातील ९ ते १० TMC पाणी मिळत असल्याने ते पाणी पुढील वर्षापासून नीरा देवघर वितरिकता चालू झाल्यानंतर कमी होण्याची शक्यता निर्माण झाली असणे, याचा परिणाम नीरा उजवा कालव्यावर मोठ्या प्रमाणात होणार असणे, याबाबत मध्यप्रदेश राज्यातील मोहनपुरा धरण प्रकल्पाच्या धर्तीवर पायलट प्रोजेक्ट म्हणून या कालव्याच्या बंद पाईप लाईनद्वारे पाणी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे निवेदनाद्वारे मागणी केली असणे, नीरा देवघर प्रकल्पामध्ये माळशिरस तालुक्यातील शिंगोर्णी, पिलीव, सह उर्वरित १७ गावांचा समावेश या प्रकल्पामध्ये झाला नसणे, नीरा देवकर प्रकल्प PDL बंद पाईपलाईन योजनेच्या खर्चामध्ये शेतकऱ्यांच्या थेट शेतापर्यंत खर्चाचा समावेश असणे, निरा देवघर प्रकल्पात बंद पाईपलाईनद्वारे पाणी देण्यासंदर्भात संपूर्ण प्रकल्पाच्या खर्चाची तरतूद करणे आवश्यक असणे, संपुर्ण प्रकल्प खर्चाची तरतूद एका आर्थिक वर्षांत करणे, याबाबत चौकशी करुन नीरा उजवा कालव्याचे पाणी बंद पाईपलाईनद्वारे पाणी थेट शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पोहोचविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(६) श्री. रमेश बोरनारे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेल्या एकत्रित राज्य जल आराखडा २०१८ (Intergrated State Water Plan Maharashtra 2018) अंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील वाकला गावासाठी भविष्यातील पाणी वापराच्या योजनेमध्ये २.०११ दश लक्ष घन मीटर पाण्याची तरतूद करण्यात येणे, ही तरतूद अस्तित्वात असल्यास, वाकला गावातील जलप्रकल्पासाठी पाणी वापरास सहमती देण्याची गरज, यासाठी सन २०२३ मध्ये वाकला गावासाठी पाणी वापरास मान्यता मिळवण्यासाठी तापी पाटबंधारे विकास महामंडळ जळगाव यांच्याकडे मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ जळगाव यांजकडून सहमती मिळण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(७) श्री. प्रविण तायडे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"श्री. शिवलिंग पटवे, तत्कालीन शिक्षण उपसंचालक, अमरावती यांच्या कार्यकाळात शेकडो शिक्षकांच्या व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या बोगस मान्यता देऊन करोडो रुपयांचा आर्थिक भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, तसेच महाविकास आघाडी सरकारच्या काळात काही राजकीय लोकांना हाताशी धरून घोटाळा झालेला असून यामध्ये एक माजी राज्यमंत्री यांचा सहभाग असणे, बोगस भरती करण्यात आलेल्या शिक्षकांना थकीत वेतन सुद्धा देण्यात आले असणे, या प्रकरणात एकूण १३ व्यक्तींचा समावेश असणे, याच प्रकरणात महत्त्वाचा आरोपी हा अचलपूर मधला असणे, याच आरोपीने अनेक शाळांना अल्पसंख्याक दर्जा मिळून दिला असणे, हा बोगस दर्जा मिळून देण्याकरीता १० लाख रुपयांची मागणी होत असणे, श्री. शिवलिंग पटवे, शिक्षण उपसंचालक यांच्याच काळात अमरावती येथून संपूर्ण विभागात या बोगस शिक्षक भरती घोटाळ्याची सुरूवात होणे, या प्रकरणाची SIT मार्फत चौकशी करण्याची आवश्यकता, त्यानुसार संबंधीत अधिकारी व आरोपी यांच्यावर कारवाई करण्याची गरज, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(८) श्री. धर्मरावबाबा आत्राम, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"गडचिरोली जिल्ह्यात अनेक वर्षापासून आदिवासी व गैरआदिवासी गरीब शेतकरी महसूल व वनविभागाच्या जमिनीवर अतिक्रमण करुन आपले उदरनिर्वाह करीत असणे, त्याबाबतच्या नोंदी महसूल व वनविभागाच्या कार्यालयात उपलब्ध असणे, शासनाच्या नियमाप्रमाणे काही प्रमाणात आदिवासी व गैर आदिवासींना त्यांनी अतिक्रमीत केलेल्या जागेचे मालकी पट्टे देण्यात आले असणे, परंतु सद्य:स्थितीत अनेक आदिवासी व गैरआदिवासी लोकांना त्यांनी अतिक्रमीत केलेल्या जागेच्या मालकी हक्काचे पट्टे वितरीत करण्यात आलेले नसणे, मालकी हक्काचे पट्टे वितरीत करण्याची प्रक्रिया ही अत्यंत संथ गतीने सुरु असल्यामुळे जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांना त्यांच्या अतिक्रमीत जमिनीचे मालकी हक्क प्राप्त झालेले नसणे, त्यामुळे अतिक्रमण धारकांना शासनाच्या अनेक योजनांपासून वंचित रहावे लागत असणे, त्यामुळे त्यांच्या मनात शासनाप्रती द्वेशाची भावना निर्माण झाली असणे, सन्मा. सदस्य गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री असतांना जिल्हाधिकारी कार्यालयात शेतकऱ्यांना वनपट्टे वितरीत करण्याकरीता स्वतंत्र्य कक्ष उघडून हजारो शेतकऱ्यांना मालकी हक्काचे पट्टे वितरीत केले असणे, परंतु नंतर ती योजना बंद पडली असणे, त्याच धर्तीवर तातडीची निकड व सार्वजनिक हिताच्या दृष्टीने गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी व गैरआदिवासी गरीब शेतकऱ्यांना त्यांनी अतिक्रमण केलेल्या जागेच्या मालकी हक्काचे पट्टे नियमानुसार तातडीने मिळण्याकरीता जिल्हाधिकारी कार्यालयात स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याची नितांत गरज असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(९) श्री. शिवाजी पाटील, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड विधानसभा मतदारसंघातील चंदगड, गडहिंग्लज व आजरा या तालुक्यातील ग्रामीण भागातील सर्व ग्रामीण रस्ते दर्जोन्नती नसलेले रस्ते निधीअभावी नादुरुस्त व खड्डेमय झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात अपघात होत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, चंदगड, गडहिंग्लज व आजरा तालुक्यातील ग्रामीण मुख्य रस्त्यावर असलेली प्रचंड रहदारी पाहता शेतकरी, नागरिक व विद्यार्थ्यांना आपला जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असणे, चंदगड तालुक्यातील धनगरवाडे यांना जोडणारे ग्रामीण रस्त्यांची दुरवस्था झालेली असणे, सदरहू रस्त्यांना दर्जोन्नती देऊन निधीची तरतूद करणेबाबत कोणतीही कार्यवाही वा उपाययोजना केलेली नसणे, यावर शासनाने करावयाची ठोस उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**(१०) डॉ. बाबासाहेब देशमुख, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यात दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने माहे एप्रिल २०१९ ते ऑक्टोबर २०१९ या कालावधीत १४६ चारा छावण्यांच्या प्रलंबित अनुदानाबाबत दिनांक ११ ऑक्टोबर, २०२३ रोजी झालेल्या बैठकीत तत्कालीन मंत्री मदत व पुनर्वसन यांनी चारा छावणी चालकांनी ठेवलेल्या कागदपत्रांमध्ये काही त्रुटी असल्यास त्रुटींची पूर्तता करण्याकरिता विभागीय आयुक्त, पुणे यांच्या कार्यालयातील किमान उपायुक्त यांच्या स्तरावरील अधिकाऱ्यांकडे सर्व संबंधित चारा छावणी चालकांची सुनावणी आयोजित करून राज्य कार्यकारी समितीच्या निर्णयानुसार पात्र चारा छावणीच्या सुधारित प्रस्ताव शासनास दिनांक २८ जून, २०२४ रोजी सादर करण्यात येणे, यामध्ये सांगोला व मंगळवेढा तालुक्यातील चारा छावणीधारकांचे प्रलंबित देयकाबाबत अनुक्रमे रु. २०,८६,९०,५९३/- व रु. १२,०७,५०,७३१/- इतक्या सुधारित अनुदान मागणीचा प्रस्ताव सादर करण्यात येणे, सदर प्रस्तावास मा. मंत्री मंडळ उपसमितीच्या दिनांक १ जुलै, २०२४ रोजीच्या बैठकीमध्ये मंजूरी देण्यात येऊन राज्य आपत्ती प्रतिसाद निधिमधून चारा छावणी चालकांच्या प्रलंबित अनुदानाचा खर्च करण्यात येणार असणे, यास्तव विभागीय आयुक्त पुणे यांच्याकडून दिनांक २८ जून, २०२४ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव राज्य कार्यकारी समितीसमोर सादर करण्यात येणे, परंतु सदर प्रस्तावाबाबत राज्य कार्यकारी समितीद्वारे अद्यापही निर्णय न घेण्यात आल्याने सांगोला, मंगळवेढा तालुक्यातील चारा छावणी धारकांचे अनुदान प्रलंबित असल्याने चारा छावणी धारकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : शासकीय विधेयके :-**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

(१) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८० - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०२५

(२) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८१ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५

---

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

(१) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७९ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२५

(२) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८१ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५

**सहा : (सोमवार, दिनांक १४ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री रणधीर सावरकर, अर्जुन खोतकर, अब्दुल सत्तार, सुधीर मुनगंटीवार, दिलीप वळसे-पाटील, दिपक केसरकर, सुरेश धस, धनंजय मुंडे, रमेश बोरनारे, प्रशांत बंब, संजय बनसोडे, राजेंद्र गावित, संभाजी निलंगेकर-पाटील, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री चेतन तुपे, नारायण कुचे, शांताराम मोरे, शेखर निकम, बबनराव लोणीकर, किशोर पाटील, प्रकाश सोळंके, अभिमन्यू पवार, निलेश राणे, महेश शिंदे, गोपीचंद पडळकर, अनिल पाटील, चंद्रदिप नरके, डॉ. अतुल भोसले, सर्वश्री संजय गायकवाड, राजकुमार बडोले, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री नरेंद्र भोंडेकर, चंद्रकांत सोनवणे, सर्वश्रीमती श्वेता महाले, मंजुळा गावित, श्री. प्रताप पाटील-चिखलीकर, डॉ. संजय कुटे, श्री. राजेश क्षिरसागर, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री प्रकाश भारसाकळे, महेंद्र दळवी, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री हरिष पिंपळे, महेंद्र थोरवे, श्रीमती सना मलिक, सर्वश्री प्रवीण दटके, किरण सामंत, दिलीप बनकर, देवराव भोंगळे, संतोष बांगर, बालाजी कल्याणकर, डॉ. किरण लहामटे, श्रीमती सीमाताई हिरे, सर्वश्री चंद्रकांत पाटील, विलास तरे, हिरामण खोसकर, रमेश कराड, अमोल पाटील, चंद्रकांत नवघरे, श्रीमती नमिता मुंदडा, सर्वश्री सुहास कांदे, अमोल खताळ, डॉ. तुषार राठोड, सर्वश्री विठ्ठल लंघे, राजेश पवार, बाबुराव कदम-कोहळीकर, आनंद तिडके, राणाजगजितसिंह पाटील, हिकमत उढाण, राजेंद्र यड्रावकर-पाटील, विक्रम पाचपुते, राजेश मोरे, विजय शिवतारे, ॲड. राहुल कुल, डॉ.तानाजी सावंत, श्री. सुहास बाबर, डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री सत्यजित देशमुख, शंकर मांडेकर, सुभाष देशमुख, अनुपभैय्या अग्रवाल, काशिराम पावरा, विजय देशमुख, दिलीप बोरसे, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री महेश लांडगे, मंगेश चव्हाण, प्रताप अडसड, प्रविण तायडे, राजू तोडसाम, समीर कुणावार, राजेश वानखडे, राजेश बकाने, विनोद अग्रवाल, विजय रहांगडाले, किशोर जोरगेवार, डॉ. मिलिंद नरोटे, श्रीमती सई डहाके,**

**सर्वश्री श्याम खोडे, आमश्या पाडवी, श्रीमती रंजनाताई जाधव, सर्वश्री शरद सोनवणे, उमेश यावलकर, किसन वानखेडे, कृष्णा खोपडे, किर्तीकुमार भांगडिया, तान्हाजी मुटकुळे, श्रीमती अनुराधा चव्हाण, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री जितेश अंतापुरकर, करण देवतळे, चरणसिंग ठाकूर, सुधीर गाडगीळ, अमल महाडिक, हेमंत रासने, सुनिल कांबळे, मनोज घोरपडे, सचिन कल्याण-शेट्टी, शंकर जगताप, राजेश पाडवी, डॉ. आशिष देशमुख, श्री. राघवेंद्र पाटील, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री चैनसुख संचेती, केवलराम काळे, संजय पुराम, समीर मेघे, संतोष दानवे, भिमराव तापकीर, भिमराव केराम, अमोल जावळे, रत्नाकर गुट्टे, सिद्धार्थ शिरोळे, राहुल आवाडे, देवेंद्र कोठे, डॉ. विजयकुमार गावित, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री मोहन मते, किसन कथोरे, प्रशांत ठाकूर, शिवाजी पाटील, काशिनाथ दाते, विजयसिंह पंडित, ज्ञानेश्वर कटके, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्र केंद्रस्थानी ठेऊन राज्यात सिंचन क्षेत्राकडे विशेष लक्ष देण्याचा शासनाचा प्रयत्न असणे, कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमता (ए-आय) तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे धोरण अंमलात आले असणे, जलयुक्त शिवार योजना, नदीजोड प्रकल्प आणि रखडलेल्या सिंचन योजनांच्या माध्यमातून कृषी सिंचन वाढविण्यावर भर देण्यात आला असणे, विदर्भातील वैनगंगा-पैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प पूर्ण झाल्यास १० लाख एकर जमीन ओलिताखाली येण्याची शक्यता असणे, नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पामुळे नाशिक व जळगाव जिल्ह्यातील ४९,५१६ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार असणे, दमणगंगा-एकदरे-गोदावरी या २३०० कोटी रुपये किंमतीच्या नदीजोड प्रकल्पामुळे ३.५५ टीएमसी पाणी उपलब्ध होणार असणे, तापी महापुनर्भरण या १९,३०० कोटी रुपये किंमतीच्या सिंचन प्रकल्पामुळे उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम विदर्भातील खारपाण पट्ट्यातील शेतकऱ्यांना लाभ होणार असणे, महाकृषी विकास अभियान अंतर्गत केवळ १ रुपयात राबविण्यात येणाऱ्या पिक विमा योजनेत नियमितता ठेवण्याच्या दृष्टीने कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी अधिक सतर्क होण्याची आवश्यकता, अटल भूजल योजना अधिक गतीमान करण्याची आवश्यकता, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ ला मंत्रीमंडळाची मान्यता मिळणे, कोकणातील उल्हास आणि वैतरणा नद्यांच्या खोऱ्यातून ५४.७० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचा प्रकल्प प्रस्तावित असणे, राज्यात शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्त्वाचे पांदण रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता "मातोश्री पांदण रस्ते योजना" अधिक सुटसुटीत करुन राबविण्याची आवश्यकता, राज्यात सन २०२४-२०२५ च्या हंगामांतर्गत सोयाबीन, तूर, ज्वारी, चना, कापूस इ. धान खरेदी झाली असणे, शासकीय खरेदी योजनेतील अनियमितता टाळण्यासाठी योजना सक्षम करण्याची आवश्यकता, राज्यात काही गावांतील शेतकऱ्यांना डिजिटल पद्धतीने देण्यात येणारे लाभ मिळण्यात असलेल्या अडचणी दूर करण्याची आवश्यकता, 'मॅगनेट २.०' अंतर्गत कृषी व्यवसायाला चालना देण्यासाठी विशेष योजना हाती घेण्यात आली असणे, ऊर्जा वापराला प्रोत्साहन देतानाच ऊर्जा निर्मितीवर भर देण्यात येत असणे, १६००० मेगावॅट क्षमतेच्या सौरऊर्जा प्रकल्पांना गती देण्याचे धोरण आखण्यात येणे जेणेकरून, शाश्वत व स्वच्छ ऊर्जा मिळेल आणि औद्योगिक क्षेत्राला त्याचा फायदा होईल, राज्यातील सर्व शासकीय इमारती सन २०२५ या वर्षाच्या अखेरपर्यंत संपूर्णपणे सौरऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्याचे धोरण असणे, शेतकऱ्यांना सिंचनासाठी सौर कृषीपंप

उपलब्ध करून देणारी "मुख्यमंत्री सौर कृषी योजना" राज्यात प्रभावीपणे राबविण्यात येत असणे, सौर ऊर्जेचा वापर वाढवून शाश्वत शेतीला प्रोत्साहन देण्याचे शासनाचे उद्दिष्ट असणे, महाराष्ट्र देशासाठी रोल मॉडेल व्हावे व राज्यातील शेतकरी सुजलाम-सुफलाम व्हावा यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

**सात : (सोमवार, दिनांक १४ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री विजय वडेट्टीवार, आदित्य ठाकरे, जयंत पाटील, नाना पटोले, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री अजय चौधरी, रोहित पाटील, डॉ. बाबासाहेब देशमुख, सर्वश्री अमीन पटेल, दिलीप सोपल, रोहित पवार, अमित देशमुख, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री उत्तमराव जानकर, अस्लम शेख, कैलास घाडगे-पाटील, संदिप क्षिरसागर, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री सुनिल राऊत, बापूसाहेब पठारे, अमित झनक, संजय पोतनीस, नारायण पाटील, विकास ठाकरे, नितीन देशमुख, अभिजीत पाटील, शिरीषकुमार नाईक, वरुण सरदेसाई, राजू खरे, संजय मेश्राम, अनंत (बाळा) नर, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री साजिद खान पठाण, हारुन खान, हेमंत ओगले, महेश सावंत, रामदास मसराम, प्रविण स्वामी, अनिल मांगुळकर, मनोज जामसुतकर, गजानन लवटे, सिद्धार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :- (मंत्र्यांचे उत्तर)**

"मागील काही वर्षांपासून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका न झाल्याने या संस्थांवर प्रशासकाचे नियंत्रण असणे, त्यामुळे राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती या अंतर्गत येणाऱ्या शहरी भागात पायाभुत सुविधांचा बोजवारा उडाला असणे, लोकप्रतिनिधींचा वचक नसल्यामुळे मनमानीपणे कारभार सुरू असणे, त्यामुळे यामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार व भ्रष्टाचार होत असल्याची प्रकरणे उघडकीस येणे, स्थानिक स्वराज्य संस्थांना योग्य मोबदला मिळत नसल्याने विकासाची अनेक कामे रखडलेली असणे, रस्त्याच्या कामात मोठ्या प्रमाणात निविदांची रक्कम वाढविल्यामुळे कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार होऊन सदरची कामे निकृष्ट दर्जाची झाली असणे, शहरी भागात प्रदुषणाने विळखा घातला असून धुळीचे साम्राज्य, कचऱ्याचे ढिग, नवीन बांधकामे होत असताना त्यातून निघणारे डेब्रिज, प्लास्टिक पिशव्यांचा मोठ्या प्रमाणात वापर त्यामुळे शहरी भागात पर्यावरणाचा झालेला ऱ्हास, शहरी भागात डंपिंग ग्राऊंडमुळे निर्माण झालेला प्रश्न, डंपिंग ग्राऊडसाठी जागा उपलब्ध नसणे, झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास करण्यास होत असलेला विलंब, जुन्या व धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाबाबत रखडलेली प्रकरणे, पावसाळ्यापुर्वी करण्यात येणाऱ्या नालेसफाईमध्ये होत असलेला भ्रष्टाचार, महानगरपालिका अंतर्गत रुग्णालयातील रिक्त पदांमुळे व अद्ययावत उपकरणांअभावी रुग्णांना उपचार देण्यात येणा-या अडचणी, स्मार्ट सिटी प्रकल्पाबाबत शासनाने दाखविलेल्या उदासिनतेमुळे अनेक प्रकल्प रखडलेले असणे, मुंबई महापालिकेच्या के/पश्चिम वॉर्डातील जुहूतारा रोड येथील "सो हो हाऊस" या पंचतारांकित हॉटेलचे बांधकाम करताना कोस्टल रेग्युलेशनचे झालेले उल्लंघन, २ चटईक्षेत्र निर्देशांक मिळत असतांना २.५ जास्त चटई क्षेत्र देऊन दिलेले भोगवटा प्रमाणपत्र, सदर हॉटेलमध्ये मोठ्या प्रमाणात झालेले अनधिकृत बांधकाम, स्थानिक

नगरसेवकांनी महानगरपालिकेकडे केलेल्या तक्रारी, माजिवडे (जि. ठाणे) येथील कांदळवन-तिवरे नष्ट करून रुस्तमजी अर्बेनिया या इमारतीचे झालेले बांधकाम, पर्यावरण कायद्यांचे झालेले उल्लंघन, या इमारतींसमोर अशाच प्रकारचे झालेले अनधिकृत बांधकाम, मुंबईतील वांद्रे (पूर्व) विभागातील रखडलेले पुनर्विकास प्रकल्प, परभणी नगरविकास विभागाच्या अमृत-२ अभियान योजनेंतर्गत येलदरी समांतर पाणीपुरवठा योजना, भुयारी गटार योजना, डंपिंग ग्राउंड, डिगी नाला खोलीकरण व रुंदीकरण, भिमनगर येथील अंडरपास रस्ता आणि महापालिका क्षेत्रात नवीन नाट्यगृह बांधणे या विकास कामांच्या प्रस्तावास जुलै, २०२२ ते जानेवारी, २०२३ दरम्यान राज्यस्तरीय उच्चधिकार समितीने दिलेली मान्यता, सदर प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी नगरविकास विभागाकडे प्रलंबित असणे, स्थानिक लोकप्रतिनिधींकडून वारंवार शासनाकडे पाठपुरावा करूनही अद्याप उपरोक्त विकास कामांना उपलब्ध न झालेला निधी, निधीअभावी गेल्या २-३ वर्षांपासून सदर योजनांची रखडलेली कामे, ठाणे शहरातील नागरिकांनी क्लस्टर योजनांना केलेला तीव्र विरोध, विरोध डावलून नागरिकांच्या घरांवर त्यांना सुचना न देता नोंदणी क्रमांक टाकण्यात येणे. ठाणे जिल्हा झोपडपट्टी पुनर्विकास योजनेचा उडलेला बोजवारा, या योजनेत झालेली अनियमितता व भ्रष्टाचार, ठाणे म.न.पा. आणि महसूल विभागात झालेला भ्रष्टाचार, पुणे जिल्ह्यात विविध प्रकल्पांच्या पुनर्वसनाच्या भुखंड वाटपात झालेला भ्रष्टाचार, राज्यातील देवस्थान इनाम जमिनींची परस्पर विक्री करून झालेला भ्रष्टाचार, विविध महसूल कायद्यांमध्ये आवश्यक असलेल्या कालबद्ध सुधारणा, नामदेववाडी को-ऑप. सोसायटी, फॉरजेट स्ट्रीट, मुंबई या सोसायटीचा मागील १५ वर्षांपासून रखडलेला पुनर्विकास, बांधकाम कामगार मंडळातील विविध वस्तू वाटपात झालेला भ्रष्टाचार तसेच मंडळाच्या सचिवाची नियमबाह्य केलेली पुनर्नियुक्ती, कोकणातील विकास कामांसाठी गेल्या ३ वर्षांपासून न देण्यात आलेला निधी, कोकणात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या प्लॅनला गेल्या दोन वर्षांत न देण्यात आलेली मंजुरी, पावसामुळे नादुरुस्त झालेल्या कोकणातील साकव तसेच पुलांची तातडीने दुरुस्ती करण्याची आवश्यकता, तसेच शाळा इमारती, अंगणवाडी इमारती, ग्रामपंचायत कार्यालयांच्या इमारतींसाठी निधी मंजूर करण्याची आवश्यकता, अतिवृष्टीमुळे कोकणात रस्ते खराब होण्याचे प्रमाण अधिक असल्याने रस्त्यांसाठी विशेष निधीची आवश्यकता, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणाचे अत्यंत धिम्या गतीने सुरू असलेले काम, मे, २०२५ मध्ये पडलेल्या अवकाळी पावसामुळे सदर महामार्गावर मोठ्या प्रमाणावर पडलेले खड्डे व त्यामुळे वाढलेले अपघाताचे प्रमाण, राज्यातील तिर्थक्षेत्रांना जोडणारा "'शक्तीपीठ महामार्ग" बांधण्याची शासनाची योजना, राज्यातील १२ जिल्ह्यातून जाणारा सदर महामार्ग, तिर्थक्षेत्रांकडे जाण्यासाठी अगोदरच असलेले रस्त्यांचे जाळे, सदर महामार्गाला राज्यातील जनतेचा असलेला विरोध, तसेच गेल्या काळात राज्याच्या आरोग्य खात्यातील आणखी एक गंभीर प्रकरण उघडकीस येणे, लसींच्या साठवणुकीसाठी महत्त्वाच्या असलेल्या कोल्ड चेन उपकरणांच्या तब्बल ६२ कोटींच्या टेंडर प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळून येणे, खुल्या बाजारातील किंमतीच्या चार ते पाचपट दरात खरेदी करुन अधिकारी आणि ठेकेदारांनी सुमारे ४० ते ५० कोटी रुपयांचा गैरव्यवहार करणे, सार्वजनिक आरोग्य विभागात वैद्यकीय उपकरणे खरेदीसाठी काढलेल्या RT १४५ क्रमांकाच्या ५६ कोटी रुपयांच्या निविदा प्रक्रियेत मोठी अनियमितता आणि संगनमत असणे, आवश्यक वैद्यकीय उपकरणे आणि साहित्याच्या

खरेदीत झालेला घोटाळा, जीईएम पोर्टलवर या यंत्राची किंमत सुमारे ४ लाख ४८ हजार रुपये इतकी असणे, हेच यंत्र आरोग्य विभागाने प्रत्येकी सुमारे ६ लाख १० हजार रुपये दराने खरेदी करणे, आरोग्य विभागातील जिल्हा आरोग्य अधिकारी आणि खनिकर्म विभागातील जिल्हा खनिकर्म अधिकारी व ठेकेदार संस्थेने संगनमताने कुठलीही विहित खरेदी प्रक्रिया राबविली नसल्याचे दिसून येत असून यंत्रसामुग्रीची बाजारातील किंमतीची शहानिशा न करता अधिकच्या दराने खरेदी करण्यात येणे, मराठवाडा व विदर्भात नवीन उद्योग व गुंतवणूक आणण्याबाबत शासनाच्या उदासीनतेमुळे बेरोजगारी व आत्महत्यांचे प्रमाण वाढणे, राज्यातील औद्योगिक प्रकल्प बाहेर जाणे, वैधानिक विकास मंडळांच्या पुनरुज्जीवनाबाबत केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा न केल्यामुळे मागास भागात मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला अनुशेष, जातीचे प्रमाणपत्र वेळेत मिळण्यात होत असलेली अक्षम्य दिरंगाई, शासनाच्या विविध योजनांना लाभ व्हावा म्हणून ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्याची सोय असणे, असे अर्ज करीत असताना संपूर्ण दिवसभर सर्व्हर डाऊन राहत असल्याने केवळ एका अर्जासाठी संपूर्ण दिवस वाया जाणे, शासनाच्या विविध विभागातील पदभरतीकरिता आयोजित करण्यात येत असलेल्या परिक्षांचे शुल्क अत्यंत जास्त असल्याने गरीब कुटुंबातील परिक्षार्थींना शुल्क भरण्यात अडचणी येणे, ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या आशा सेविकांच्या पगारवाढीचा प्रश्न प्रलंबित असून काही महिन्यांपासून त्यांना पगारही न मिळणे, रोजगार देण्याची संधी असतानाही राज्यातील विविध विभागाअंतर्गत रिक्त असलेल्या २ लाख ४० हजार जागा न भरणे, ठराविक सदस्यांनाच विकास कामांसाठी निधी उपलब्ध होत असल्याने समतोल विकासाच्या संकल्पनेला बसलेला खीळ, त्यामुळे जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

आठ : **सर्वश्री अतुल भातखळकर, अर्जुन खोतकर, दिलीप वळसे-पाटील, डॉ. संजय कुटे, सर्वश्री अब्दुल सत्तार, धनंजय मुंडे, ॲड. राहुल कुल, डॉ. तानाजी सावंत, श्री. संजय बनसोडे, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री दिपक केसरकर, चेतन तुपे, रणधीर सावरकर, रमेश बोरनारे, शेखर निकम, श्रीमती सीमाताई हिरे, सर्वश्री राजेंद्र गावित, प्रकाश सोळंके, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री विजय शिवतारे, अनिल पाटील, श्रीमती मनिषा चौधरी, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री शांताराम मोरे, सुधीर मुनगंटीवार, राजकुमार बडोले, किशोर पाटील, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री प्रताप पाटील-चिखलीकर, मंगेश कुडाळकर, सर्वश्रीमती सुलभा गायकवाड, सुलभा खोडके, सर्वश्री प्रकाश सुर्वे, गोपीचंद पडळकर, नरेंद्र भोंडेकर, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री प्रशांत बंब, निलेश राणे, श्रीमती सना मलिक, सर्वश्री विक्रम पाचपुते, महेश शिंदे, दिलीप बनकर, प्रवीण दटके, संजय गायकवाड, प्रदीप जैस्वाल, हरिष पिंपळे, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री देवराव भोंगळे, राजेश क्षिरसागर, चंद्रकांत नवघरे, डॉ. तुषार राठोड, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री सचिन पाटील, सुमित वानखेडे, चंद्रकांत सोनवणे, सुहास कांदे, अभिमन्यू पवार, शंकर मांडेकर, चंद्रदिप नरके, सुनिल कांबळे, काशिनाथ दाते, महेंद्र दळवी, भिमराव तापकीर, नारायण कुचे, नरेंद्र मेहता, महेंद्र थोरवे, विजयसिंह पंडित, अशोक पाटील, किसन कथोरे, हिरामण खोसकर, बालाजी कल्याणकर, संजय केळकर, ज्ञानेश्वर कटके, संतोष बांगर, मोहन मते, विलास तरे, संतोष दानवे, विश्वनाथ भोईर, उमेश यावलकर, चंद्रकांत पाटील, किशोर जोरगेवार,**

**आमश्या पाडवी, महेश लांडगे, राजेंद्र यड्रावकर-पाटील, शरद सोनवणे, समीर कुणावार, श्रीमती रंजनाताई जाधव, सर्वश्री अमित साटम, मुरजी पटेल, दिलीप लांडे, योगेश सागर, तुकाराम काते, अमोल पाटील, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री किरण सामंत, सुहास बाबर, विठ्ठल लंघे, प्रकाश भारसाकळे, बाबुराव कदम-कोहळीकर, सत्यजित देशमुख, सुरेश धस, बबनराव लोणीकर, समाधान आवताडे, आनंद तिडके, हिकमत उढाण, डॉ. अतुल भोसले, सर्वश्री अमोल खताळ, राजेश मोरे, मंगेश चव्हाण, विलास भुमरे, मिहिर कोटेचा, पराग शाह, मोनिका राजळे, अनुपभैय्या अग्रवाल, समीर मेघे, प्रशांत ठाकूर, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री संजय उपाध्याय, राजन नाईक, राणाजगजितसिंह पाटील, राजेश पवार, डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री प्रताप अडसड, सुभाष देशमुख, राजेश वानखडे, विजय देशमुख, राजेश बकाने, डॉ. आशिष देशमुख, सर्वश्री देवेंद्र कोठे, सचिन कल्याण-शेट्टी, श्याम खोडे, श्रीमती अनुराधा चव्हाण, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री जितेश अंतापुरकर, अमल महाडिक, शंकर जगताप, चैनसुख संचेती, केवलराम काळे, हेमंत रासने, करण देवतळे, डॉ. मिलिंद नरोटे, श्री. रत्नाकर गुट्टे, कॅ. आर. तमील सेल्वन, कृष्णा खोपडे, शिवाजी पाटील, काशिराम पावरा, दिलीप बोरसे, चरणसिंग ठाकूर, किसन वानखेडे, सुधीर गाडगीळ, विजय रहांगडाले, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री अमोल जावळे, सिद्धार्थ शिरोळे, राहुल आवाडे, राघवेंद्र पाटील, संजय पुराम, राजू तोडसाम, मनोज घोरपडे, किर्तीकुमार भांगडिया, श्रीमती सई डहाके, सर्वश्री रमेश कराड, संभाजी निलंगेकर-पाटील, सुरेश भोळे, विनोद अग्रवाल, रविशेठ पाटील, तान्हाजी मुटकुळे, प्रविण तायडे, शिवाजी कर्डिले, भिमराव केराम, श्रीमती स्नेहा दुबे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"राज्यात परकीय थेट गुंतवणूक आणि स्टार्टअप संख्येच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य देशात आघाडीवर असणे, शासनाने स्टार्टअप युको सिस्टीम उभी करण्यासाठी १२० कोटी रुपयांचा 'फंड ऑफ फंडस्' तयार केला असून त्यायोगे आर्थिक सक्षम आणि विक्रीयोग्य स्टार्टअप्सना आर्थिक मदत दिली जाणार असणे, सर्क्युलर इकॉनॉमीवर भर देत महाराष्ट्र राज्य देशाची स्टार्टअप राजधानी बनली असणे, समृध्दी महामार्गामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांचा भूगोल व अर्थकारण बदलणार असणे, दावोस येथे ६३ कंपन्यांशी झालेल्या सामंजस्य करारातून १५ लाख ७२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आणि १६ लाख रोजगार निर्मिती अपेक्षित असणे, नवीन औद्योगिक धोरणातून सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देण्यासोबतच अंतराळ, संरक्षण, इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात गुंतवणूक आकर्षित करण्याचे नियोजन असल्याने राज्यातील तरुणांना रोजगारांच्या नव्या संधी उपलब्ध होणार असणे, पुर्व व पश्चिम विदर्भात औद्योगिक व परकीय गुंतवणूक करण्याची व कापुस उत्पादकांच्या आत्महत्या रोखण्याकरिता कापड उद्योगास चालना देण्याची आवश्यकता, राज्यातील मुंबई, नागपूर, पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, संभाजीनगर इ. मधील शहरी भागात वारंवार विज खंडीत होणे, अनियमित पाणीपुरवठा, मल:निस्सारण प्रकल्पांची कमतरता, भुयारी गटारे इ. मुलभूत नागरी समस्या भेडसावत असल्याने त्यांचे निराकरण करण्याकरिता तातडीने लक्ष देण्याची व प्रारूप विकास आराखड्यामध्ये त्याबाबत तरतूद करण्याची आवश्यकता, महिला सक्षमीकरणासाठी राज्यात आदिशक्ती अभियान राबविण्यात येणार असणे, महिलांच्या सामाजिक, शैक्षणिक,

आरोग्यविषयक समस्या सोडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या महिलांना आदिशक्ती पुरस्कार प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात येणे, महिलांच्या आरोग्याबाबतच्या समस्यांचे संवेदनशीलपणे निवारण करणे, कुपोषण, बालमृत्यू, मातामृत्यूचे प्रमाण कमी करणे, मुलींमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढविणे, लैंगिक आणि शारीरिक अत्याचाराला प्रतिबंध करणे, पंचायतराज पद्धतीत महिला नेतृत्त्वाचा सहभाग वाढविणे, महिलांना आर्थिक सक्षम करणे इ. या अभियानाची उद्दीष्ट असणे, लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीच्या पावनपर्वात राज्यातील महिला स्वयंसिद्ध होण्याच्या दृष्टीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना सुरू करण्यात आली असणे, या योजनेंतर्गत १५ एप्रिल, २०२५ पर्यंत ५२ महिलांना एकूण २ कोटी ३४ लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात आले असणे, राज्यातील महिलांमध्ये 'जागतिक दर्जाचे कुशल मनुष्यबळ तयार करणे' आणि नोकरी मागणाऱ्याऐवजी नोकऱ्या देणारे नागरिक घडविणे यासाठी महिलांचे योगदान निर्णायक ठरणार असणे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सहकारी तत्वावरील महामंडळासाठी १० हजार कोटी रुपयांची तरतूद केली असणे, मेंढपाळांसाठी कर्ज योजना, पावसाळ्यात चराई रान राखून ठेवणे, राज्यातील धनगर वाड्यांना मुख्य रस्त्यांशी जोडणे, धनगर समाज बांधवांसाठी दरवर्षी २५ हजार घरे बांधणे इ. धोरण राबविण्यात येणे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या मंदिर पुनर्निमाणाच्या कामाला अभिवादन म्हणून राज्यातील विविध ७ तिर्थस्थळांच्या विकासासाठी ५,५०३ कोटी रुपयांच्या आराखड्याला मंजूरी देण्यात आली असणे, अहिल्यानगर येथे मुलींसाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्यात आली असणे, पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या स्मृतीस्थळांचे जतन व संवर्धनासाठी ६८१ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असणे, 'विकसित भारत व विकसित महाराष्ट्र' घडविण्यासाठी अधिक कार्यवाही करण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**नऊ : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक ८ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना (सूचना क्र. १ ते ४)**

**(१) श्री. मनोज जामसुतकर, वि.स.स.**

"राज्यातील अनेक जिल्ह्यांत बिबटे व वाघांचे होणारे मृत्यू रोखण्याबाबत" यावरील श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ७५० ला दिनांक ०६ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(२) श्री. भीमराव तापकीर, वि.स.स.**

"राज्यातील सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही (CCTV) कॅमेरे बसविण्याबाबत" या विषयावरील श्री. विजय वडेट्टीवार व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ७२५१ ला दिनांक ०२ जुलै, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(३) श्री. मोहन मते, वि.स.स.**

"जव्हार (जि. पालघर) नगर परिषदेतील विकास कामांना तांत्रिक मान्यता न देता शासकीय निधीचा केलेला अपहार" या विषयावरील श्री. मंगेश कुडाळकर व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २६९ ला दिनांक ०७ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(४) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.**

"राज्यात जल जीवन मिशन योजनेंतर्गत पाणीपुरवठा करणेबाबत" या विषयावरील श्री. राहुल आवाडे व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ७०८९ ला दिनांक ०३ जुलै, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(५) श्री. संजय केळकर, वि.स.स.**

"राज्यातील अनेक विकास प्रकल्पांना महारेराने बजाविलेल्या नोटीसा" या विषयावरील श्रीमती सरोज अहिरे व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ५०० ला दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(६) श्री. किशोर पाटील, वि.स.स.**

"राज्यात "बळीराजा" शेत व पाणंद रस्ते योजना या योजनांचा शासन निर्णय काढून निधी देण्याबाबत" या विषयावरील श्री. अमिन पटेल व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ८७२८ ला दिनांक ४ जुलै, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(७) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.**

"राज्यातील महिलांमध्ये कर्करोगाचे प्रमाण वाढत असल्याबाबत" या विषयावरील श्री. रविशेठ पाटील व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १३०७६ ला दिनांक १० जुलै, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**अशासकीय कामकाज**

**दहा : अशासकीय विधेयके :-**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

**डॉ. राहुल वेदप्रकाश पाटील, वि.स.स. यांचे** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७२ - महाराष्ट्र राज्यातील ज्येष्ठ नागरिक (सेवा, सुविधा इत्यादी देण्याबाबत) विधेयक, २०२५.

**(ब) विचारार्थ :-**

**(शुक्रवार, दिनांक ११ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली अशासकीय विधेयके) (क्रमांक १ व २)**

**(१)** **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ - कारागृहे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५.

**(२)** **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ - महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०२५.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : १४ जुलै, २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव - १,
महाराष्ट्र विधानसभा.